श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय ,वडनेर त.हिंगणघाट ,जिल्हा.वर्धा

**अहवाल - क्षेत्र अभ्यास [ field work ] - बोली भाषेचे स्वरूप [ वडनेर परिसरातील गावांच्या संदर्भात ]**

**विषय-मराठी सत्र २०२२-२३**

**समन्वयक –डॉ.प्रवीण कारंजकर**

सहभागी विद्यार्थी संख्या – २०

## क्षेत्राभ्यास - बोली भाषेचे स्वरूप (वडनेर परिसरातील गावे)

श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय वडनेर त. हिंगणघाट च्या मराठी विभागा द्वारे बोली भाषेचे स्वरूप ( वडनेर परिसरातील गावांच्या संदर्भात) हा क्षेत्राभ्यास सत्र २०२२-२३ मध्ये घेण्यात आला.

डॉ प्रवीण कारंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या मराठी विषयाच्या या क्षेत्राभ्यासात ऐकून विस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी असनारे सर्व विद्यार्थी बी.ए.भाग-३चे असून त्यांनी परिसरातील पोहणा, दोंदुडा , टेभा, पिपरी,वेणी, वडनेर इत्यादी गावातील लोकांना मराठी विभागा तयार करून दिलेली प्रश्नावली विचारून त्यांची मते जाणून घेतली

या क्षेत्राभ्यासा अंतर्गत ग्रामीण भागात प्रमाण भाषा बोलली जाते की बोली भाषा याचा अभ्यास केल्यावर असे दिसून काल की केवळ बोली भाषा किंवा केवल प्रमाणभाषा असा संवाद व्यवहार ग्रामीण भागात न होता तो बोलीभाषा व प्रमाण भाषा यांच्या मिश्र स्वरूपाचा आहे असे दिसून आलेले आहे.

ग्रामीण भागातील सुशिक्षीतांची भाषा कशी असते याचा अभ्यास केल्यावर उससे दिसून आले आहे की सुशिक्षीत वर्गाचे अध्ययन अध्यापण प्रमाण भाषेत होत असले तरी ग्रामीण भागात वावरणारा विद्यार्थी प्रत्यक्ष संवाद व्यवहारात केवळ प्रमाण भाषा न वापरता कींवा बोली भाषा बोलता प्रमाण भाषा व बोली भाषण यांच्या मिश्रणातून निर्माण होणारी भाषा बोलत असतो.

बोली भाषेचा वापर ग्रामजीवनातील दैनंदीन व्यवहारात होत असला तरी सुशिक्षीत वर्ग प्रमाण भाषेचाही बोलतांना सहजपणे वापर करतो पण बोली भाषेत प्रमाण भाषेतील सर्वच शब्दांना पर्यायी शब्द नाहीत असे सर्वक्षणात अनेकांनी मत दिले . त्याच प्रमाण बोली भाषेतील शब्दांना समानार्थी असे प्रमाणभाषेतील शब्दही नाहीत असेही दिसून आलेले आहे.

बोली भाषेचे स्वरूप लक्षात होतांना एक बाब प्रकर्षांने लक्षात आली ती ही की बोलीभाषा व प्रमाण भाषा सरळ मिसळीने ग्रामीण भागात बोलली जाते तथापि ग्रामीण भागातील स्त्रियांचा भाषेत बोली चे

शब्द अधिक आहेत तर प्रमाण भाषेचे शब्द कमी आहेत, विशेषत: ज्या स्त्रिया निरक्षर आहेत त्यांच्यात बोली भाषेचा प्रभाव अधिक दिसून येतो.

ग्रामीण भागातील स्त्रियाप्रमाणेच बोली भाषेचा प्रभाव वृद्धाच्या भाषेवरही अधिक दिसून येतो, साठ वर्ष किंवा त्या पेक्षा जास्त वयोगटाचे लोक प्रमाण भाषेती  शब्दांपेक्षा बोली भाषेतील शब्द भाषेत योजतांना दिसतात. प्रमाण भाषेतील अनेक  शब्द वृद्धासाठी  अपरिचयाचे आहेत आपल्या भावना व विचार व्यक्त करण्यासाठी ही मंडळी बोली भाषेला अधिक वापर करतात.

ग्रामीण भागाचा संबंध हा कृषीजीवनाशी येतो. त्यामुळे कृषी किंवा शेती व्यवसायाशी संबंधीत भाषा ही प्रमाण भाषण नसते तर बोलीभाषा असते.ही बोली भाषा शेतीशी संबंधीत वेगवेगळे शब्द सामावून घेणारी आहे. या शब्दांना प्रमाण मराठीत पर्यायी शब्द नाहीत असे दिसून आलेले  त्यामुळे कृषी जीवनाची भाषा ही बोलीभाषा आहे.

मराठी साहित्याचे वाचन ग्रामीण भागात केले जाते काय याचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले आहे की ग्रामीण भागात मराठी साहित्याचे वाचल ज्या अर्थाने  आपण साहित्य वाचन याचा अर्थ घेत असतो त्या अर्थी होत नाही.कादंबरी , नाटक, कविता इत्यादी सारखे साहित्य  प्रकार वाचणारा वर्ग 'क्वचितच दिसत येतो. तथापि मराठी संत साहित्याचा प्रभाव ग्रामीण भागात आहे, ज्ञानश्वरी,एकनाथी भागवत, रामदासांचा दासबोधसंत नामदेवाची अभंग गाथा,तुकडोजी महाराजांची ग्रामगीता  यासारखे संत साहित्य ग्रामीण भागातील अनेकांच्या घरी  आजही दिसून येते

ग्राम जीवनाचा संवाद व्यवहार चालतो तेव्हा विचारांची अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य या बोली भाषेत आहे काय याचा अभ्यास केल्यावर असे दिसून आलेले करते की जीवनातील संवाद व्यवहाराचे माध्यम असणारी बोली भाषा ही विचारांची अभिव्यक्ती करण्याचे सशक्त माध्यम आहे.प्रत्येक ग्रामीणांचा संवाद व्यवहार पूर्ण करण्याचे सामर्थ्य या बोली आहे.

ग्रामीण बोली भाषेत अनेक हिंदी- इंग्रजी भाषेतील शब्द येतात या शब्दांचा उच्चार प्रत्यक्ष संवाद व्यवहारात बदलतांना दिसतो , याचे कारण वेगळया प्रांताची किंवा अपरिचीत भाषा बोलतांना संवादकाला त्याचा नेमका उच्चारा बद्दल माहिती नसते हे होय.

**निष्कर्ष -**

१) वडनेर परीरसरातील गावांच्या बोलीभाषेत दैनंदिन संवादात सरळ मिसळची भाषा बोलली जात असल्याचे दिसून येते.गावात बोली भाषा आणि प्रमाण भाषा यांचे मिश्रित रूप दिसून येते.

२ ) बोली भाषेत प्रमाण भाषेतील काही शब्दांना  समानार्थी शब्द आहेत तर काही शब्दांता पर्याय उपलबद्ध नाहीत.

३) ग्रामीण भागातील नवशिक्षीत वर्ग हा प्रमाण व बोलीभाषा  यांची सरळ मिसळ करून आपला संवाद साधतांना दिसतो.

४) ग्रामीण भागातील स्त्रियाचा भर बोली भाषेवर अधिक आहे. विशेषतः निरक्षर स्त्रिया बोलीत आपला संवाद करतात.

५ )गावातील वृद्ध बोली भाषा दैनंदीनव्यवहारात अधिक प्रमाणात वापरतात.

६ )बोली भाषा शेतीशी संबंधीत अनेक शब्द सामावून घेणारी आहे.तीची कृषी क्षेत्रातील जागा प्रमाणभाषा घेऊ शकत नाही.

७ ) मराठी संत साहित्याचा प्रभाव ग्रामीण भागातील लोकावर सर्वाधिक दिसून येतो. साहित्याचे नवीन प्रकार मात्र त्यांनी स्वीकारलेल नाही

८ )  ग्रामीण बोली परीपूर्ण असून ग्रामजीवनातील सर्व संवाद व्यवहार पूर्ण करण्याचे सामर्थ या बोलीत आहे

९ )ग्रामीण बोली भाषेत इंग्रजी आणि हिंदी शब्द येतात तेव्हा त्याच्या उच्चारांचे रूप बदललेले दिसून येते.

१०) बोली भाषेत प्रमाण भाषेतील शब्द व परभाषेतील शब्दांची रूपे बदलतात. हे उच्चार ग्रामीण बोलीच्या उच्चाराला अनुकूल केले जातात.

ग्रामीण बोलीभाषेत इंग्रजी आणि हिंदी शब्दांचे उच्चार पुढील प्रमाणे बदलताना दिसतात

| अ.क्र. | **इंग्रजी भाषेतील शब्द** | **बोलीभाषेतील उच्चार** |
|---|---|---|
| १ | कॉलेज | कालेज |
| २ | बँक | ब्यांक |
| ३ | पेन्शन | पेनसन |
| ४ | टाइल्स | स्टाईल |
| ५ | स्टोव्ह | ईस्टो |
| ६ | व्होडाफोन | वडाफोन |
| ७ | सिमकार्ड | शिमकार्रड |
| ८ | ग्लास | गिलास |
| ९ | शट | शर्रट |
| १० | मर्डर | मडर |

| अ.क्र. | **प्रमाण भाषेतील शब्द** | **बोलीभाषेतील उच्चार** |
|---|---|---|
| १ | **रात्र** | **रात** |
| २ | **दुपार** | **दोयपार** |

| | | |
|---|---|---|
| ३ | साधा | सिदा |
| ४ | वेडा | येडा |
| ५ | कोठे | कुठीसा |
| ६ | वीज | ईज |
| ७ | पार्वती | पारबती |
| ८ | झोळी | झोयी |
| ९ | रक्त | रगत |
| १० | संध्याकाळ | सांज |
| ११ | ओला | वला |
| १२ | हिरवा | हिर्रवा |
| १३ | डोळा | डोया |
| १४ | पाय | तंगड |
| १५ | कपाळ | कपाय |
| १६ | डोके | डोक्स |
| १७ | शाळा | शाया |
| १८ | माता | माय |
| १९ | पायरस्ता | पांदन |
| २० | स्मशानघाट | मसणघाट |

| अ.क्र. | हिंदी भाषेतील शब्द | बोलीभाषेतील उच्चार |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | |
| १ | जानवर | जनावर |
| २ | प्याला | पेला |
| ३ | जल्दी | जलद |
| ४ | मुझे | मेरेको |
| ५ | तुझे | तेरेको |

विषय - मराठी

## क्षेत्रअभ्यास – सहभागी विद्यार्थी यादी सत्र २०२२-२३

१]  प्रज्वल गं. पाटील

२] संध्या उ. केराम

३] नेहा मा. चतारे

४] शुभम सं. शेंडे

५] प्रगती दी. येरेकर

६] भावना अ. राउत

७] अर्पिता सु. जौंजाळ

८] आदित्य वि. मासुळकर

९] दिव्यानी उ. नाखले

१०] तेजस्वीनी सु. धाडवे

११] सौरभ ज्ञा. लोंढे

१२] वैष्णवी सु. बावणे

१३]  दीक्षा रा. पोईनकर

१४]  निखिता पो. कन्नाके

१५]  अतुल निरस्कर

१६ ] अक्षय शा. वाळके

१७ ] गणेश म. जुमडे

१८ ] विकेश म. वाटगुरे

१९] प्रणय जं. धाडवे.

२० ]पायल ज. वाटाणे

## श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय ,वडनेर त.हिंगणघाट ,जिल्हा.वर्धा

**क्षेत्रअभ्यास [ field work ] विषय - बोली भाषेचे स्वरूप**

**[ वडनेर परिसरातील गावांच्या संदर्भात ]**

**विषय-मराठी सत्र २०२२-२३ समन्वयक – डॉ.प्रवीण कारंजकर**

----------------------------------

१] ग्रामीण भागात प्रमाण भाषा बोलली जाते की बोलीभाषा

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

२ ] बोलीभाषेत प्रमाणभाषेतील शब्दांना पर्यायी शब्द आहेत काय

अ] होय ब] नाही क ] सर्वच शब्दांना पर्यायी शब्द नाहीत ड] माहिती नाही

३ ] ग्रामीण भागातील सुशिक्षितांची भाषा कशी असते

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

४ ] गावखेड्यातील स्त्रियांचा कल कोणत्या भाषेकडे असतो

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] मराठी हिंदी दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

५ ] गावखेड्यातील वृद्धांच्या भाषेवरती कशाचा प्रभाव असतो

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

६ ] ग्रामीण भागातील शेतीशी सबंधित भाषा कशी असते

अ] बोली भाषा ब] पारंपारिक शब्द क ] बोली व पारंपारिक शब्द यांचे मिश्रण ड] माहिती नाही

७ ] मराठी साहित्याचे वाचन ग्रामीण भागात दिसून येते काय

अ] होय ब] नाही क ] धार्मिक साहित्याचे वाचक आहेत ड] माहिती नाही

८ ] ग्रामीण बोलीत विचारांची अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य आहे काय

अ] होय ब] नाही क ] सांगता येत नाही ड] माहिती नाही

९ ] ग्रामीण बोलीत येणाऱ्या हिंदी –इंग्रजी शब्दांचे उच्चार बदलतात काय

अ] होय ब] नाही क ] सांगता येत नाही ड] माहिती नाही

१० ] ग्रामीण बोलीत येणाऱ्या हिंदी –इंग्रजी शब्दांच्या बदललेल्या एका शब्दाचे उच्चार रूप लिहा

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्नावली भरून देणाऱ्याचे नाव –

गाव - त. हिंगणघाट , जिल्हा-वर्धा
स्वाक्षरी

विद्यार्थ्याचे नाव - वर्ग-बी.ए.भाग –

दिनांक मार्च २०२३
विद्यार्थ्याची स्वाक्षरी









